# थोडक्यात

## डिग्निटी फाउंडेशनतर्फे अल्झायमर जागृती फेरी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

डिग्निटी फाउंडेशनतर्फे जागतिक अल्झायमर दिनानिमित्त जनजागृती फेरी काढण्यात आली. पर्वती येथील शाहू मंदिर विद्यालय आणि टिंगरेनगर येथील पुणे इंटरनॅशनल स्कूल येथे ही फेरी काढण्यात आली. फेरीचे उद्‌घाटन कर्नल व्ही. के. मदन यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे छात्र यात सहभागी झाले होते. डॉ. एस. पी. शिंदे, गणेश मध्ये यांनी संयोजन केले.